REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २० एप्रिल, १९३८ अंक १६

**३ रा आठवडा** **३ रा आठवडा**

## नामांकित नटवर्य लोंढे यांची अप्रतीम भूमिका !

मराठी रंगभूमीवरील महशूर नट चिंतोपंत कोल्हटकर यांची अंगावर शहारे आणणारी भीषण भूमिका !

## सुंदर गानदेवता लीला

यांचें गोड गायन ! गोड अभिनय ! गोड संभाषण !

कामण्णाचें काम म्हणजे जणुं काय खसखशीची खैरात ! आणि खो : खो : हंशाची बरसात !

( वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. च्या खास व्यवस्थेखालील )

रे–मार्केट जवळ पुणें ) **मिनर्व्हा** ( टे नं. ३९८

**३ रा आठवडा ! शनिवार ता. १६ एप्रिल पासून सुरू !**

दररोज दोन खेळ:— ६॥ व १० वा. बुधवार ता. २० ते शुक्रवार ता. २२

भक्तिरसानें डवडवलेला शालिनी सिनेटोनचा लोकप्रिय मराठी बोलपट !

# कान्होपात्रा

दिग्दर्शक:— भाल. जी. पेंढारकर

भूमिका:—लीला, लोंढे, चिंतोपंत कोल्हटकर, दिनकर (कामण्णा), शांताबाई.

अप–टु–डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### अल्पायुषी फ्रेंच प्रधान मंडळें

फ्रान्समधील प्रधान मंडळें फार अल्पकाळपर्यंत अधिकारारूढ असतात, असा अनुभव आहे. गेल्या दहा वर्षांची सरासरी काढली तर त्यांचें अस्तित्व ५½ महिन्यांचें असल्याचें दिसून येतें.

### बी. बी. अँड सी. आय रेल्वेचें गेल्या वर्षाचें उत्पन्न

गेल्या ३१ मार्चला पुऱ्या झालेल्या बारा महिन्यांच्या अवधींत बी. बी. अँड सी. आय. रेल्वेस ११ कोटि ८५ लक्ष रु. इतकें एकूण उत्पन्न झालें. पूर्वीच्या बारमाहीच्या मानानें ह्यांत फक्त ६ लक्ष ३३ हजार रुपयांचा वाढावा आहे.

### मुंबईंत म्हशी

मुंबईंत बाहेरून येणाऱ्या म्हशींपैकीं ६९ टक्के पंजाबांतून व ३१ टक्के गुजराथेंतून आल्या, असें एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांतील आयातीच्या आकड्यांवरून समजतें. दुधाचा सरासरीचा भाव दर मणास सकाळीं १० रु. २ आ. व सायंकाळीं ११ रु. ४ आणे असा होता.

### ग्रेटब्रिटनमधील प्रवासी

ग्रेटब्रिटनमध्यें आलेल्या व तेथून बाहेर गेलेल्या ब्रिटिश व परकी प्रवाशांची एकूण संख्या १९३६ मध्यें ५ लक्ष, ५९ हजार होती ती १९३७ सालीं ५ लक्ष, ६४ हजार झाली.

### ग्रेटब्रिटनमधून विमानांची निर्गत

ग्रेटब्रिटननें गेल्या वर्षी सुमारें २½ कोटि रुपयांचीं ५०७ विमानें विकून निर्गत केलीं. त्यांपैकीं २३५ विमानें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांनीं घेतलीं. हिंदुस्थानानें ग्रेटब्रिटनमधून १८ विमानांची आयात केली.

### कपाशीचे रस्ते

रस्त्यांच्या बांधणींत कपाशीचा उपयोग करण्याचे प्रयोग अमेरिकेंत चालू आहेत. गेल्या वर्षी ५७८ मैल लांबीचे ' कपास रस्ते ' तयार करण्यांत आले.

### कोळशाच्या कणांमुळें नुकसान

लंडन शहरावर दरसाल ७५ हजार टन वजनाची कोळशाची रास व कण पडतात, त्यामुळें दर माणशीं सुमारें १२–१३ रुपयांचें नुकसान होतें.

### १६४ स्त्री पोष्टमन

ग्रेटब्रिटनमध्यें टपाल वांटण्याचें काम करणाऱ्या १६४ स्त्रिया आहेत.

### अपघातांत सांपडलेल्या इसमांच्या रक्ताची तपासणी

जर्मनींमधील रस्त्यांवर अपघातांत सांपडलेल्या प्रत्येक इसमाचें रक्त तपासून तो दारू प्यालेला होता की काय हें पाहिलें जातें. पादचारी, सायकलवाले, मोटारहांके, ह्या सर्वांस हा नियम लागू आहे.

### टेम्स नदीवरील नवीन वॉटर्लू पूल

वरील पुलाच्या कामास गेल्या आक्टोबरमध्यें प्रारंभ झाला. कंत्राटाच्या कराराप्रमाणें पुलाचें काम एप्रिल, १९४० मध्यें पुरें झालें पाहिजे.

### जपानी मालाचा उठाव

चालू वर्षी जपानी मालाची निर्गत वाढविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर करण्याचें जपाननें ठरविलें आहे.

### मालाच्या बोटी आणखी पाहिजेत

१९१४ सालीं ग्रेटब्रिटनजवळ मालाची वहातुक करणाऱ्या १ कोटि, ८९ लक्ष टनांच्या ८, ५८७ आगबोटी होत्या; आतां १ कोटि, ७४ लक्ष टनांच्या फक्त ६, ९०३ आगबोटी आहेत. युद्धाचे प्रसंगीं ह्या आगबोटी अपुऱ्या पडण्याचा संभव आहे. गेल्या युद्धांत शत्रुपक्षानें ७० लक्ष टनांच्या ब्रिटिश बोटी बुडविल्या होत्या.

### विद्यार्थ्यांचा प्रवास

प्रवासाचें शैक्षणिक महत्त्व सर्वमान्य आहे. गेल्या आठवड्यांत सुमारें ७ हजार ब्रिटिश विद्यार्थी युरोपांतील देशांकडे रवाना झाले.

### मुंबई प्रांताची आर्थिक व औद्योगिक पहाणी

मुंबई प्रांताची आर्थिक व औद्योगिक पहाणी करून सरकारास रिपोर्ट सादर करण्यासाठी मुंबई सरकारनें सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. कमिटीनें आपलें काम आक्टोबर, १९३८ अखेर पुरें करावयाचें आहे.

### परदेशांत पेरलेलें ब्रिटिश भांडवल

ब्रिटिश सरकारनें इतर देशांत गुंतविलेल्या भांडवलाची रक्कम सुमारें ५० अब्ज रुपये आहे.

### ग्रेटब्रिटनमधील धोबीचा धंदा

ग्रेटब्रिटनमधील परटाचे धंद्यांत १ लक्ष, ४७ हजार माणसें कामावर असून त्यांपैकीं शेकडा ८५ स्त्रिया आहेत. ह्या धंद्यांत एकूण सुमारें ३३ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

### फेडरल कोर्टाच्या कामास प्रारंभ

हिंदी फेडरल कोर्टापुढें लवकरच काम येण्याचा संभव आहे.

### देवालयांत चित्रपट

चित्रपटांचा उपयोग सर्व प्रकारांच्या शिक्षणाचे कामीं उत्कृष्ट रीतीनें करतां येतो असा अनुभव आल्यावरून धार्मिक व नैतिक शिक्षण त्यांच्या द्वारें देवालयांमध्यें देण्याची कल्पना सुचून दोनशे ब्रिटिश कॅथीड्रल्समध्यें सिनेमाची सोय करण्यांत येत आहे. स्थळ आणि विषय ह्यांस साजेसे पट तयार झाले आहेत आणि होत आहेत.

### ग्लासगो येथील औद्योगिक प्रदर्शन

स्कॉटलंडमध्यें ग्लासगो येथें वेंब्लेच्या तोडीचें एक प्रचंड औद्योगिक प्रदर्शन भरावयाचें असून तें मे महिन्याच्या प्रारंभीं उघडलें जाईल. प्रदर्शनानें १५० एकर क्षेत्र व्यापलें असून त्यावर १३ कोटि रुपये खर्च झाला आहे. जगाच्या सर्व भागांमधून तीन कोटि लोक प्रदर्शन पहाण्यास येतील अशी अपेक्षा आहे.

### इंग्लंडच्या तक्तावरील राजे

विल्यम दि कॉंकररनें इंग्लंड जिंकल्यापासून ( सन १०६६ ) आतांपर्यंत ३९ राजांनीं इंग्लंडवर राज्य केलें. ४ स्त्रियांनीं इंग्लंडच्या तक्ताचा उपभोग घेतला आहे. एकूण १६ वेळां राज्यकर्त्याचा ज्येष्ठ पुत्र गादीवर बसला.

### ट्रामगाड्या कमी झाल्या

इंग्लंडमध्यें ट्रामगाड्यांची लोकप्रियता कमी होऊं लागली आहे. १९२० सालीं एकूण १४,४१३ ट्रामगाड्या होत्या; गेल्या वर्षी त्यांची संख्या फक्त १०,२०० इतकीच भरली.

### नायगारा फॉल्स

नायगाऱ्याचा धबधबा जगांतील सर्व धबधब्यांत ज्यास्त प्रसिद्ध असला, तरी उंचीच्या बाबतींत त्याचा अनुक्रम ११ वा लागतो.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... १८२ | ५ महायुद्धांतील बळी | १८६ |
| २ दारूबाजी व दारूबंदी | १८३ | ६ पो. कॅ. सर्टिफिकेटांविषयीं नवीन नियम | ... १८६ |
| ३ परराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार | १८४ | ७ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. | ... १८७ |
| ४ स्फुट विचार | ... १८५ | ८ देशी कांच कारखान्यांबाबत गैरसमज | ... १८८ |
| जमीनगहाणाच्या बँका-मद्रास व मुंबई-ग्रामीवरील कर—सर जेम्स ग्रिग ह्यांचा युक्तिवाद-आर्थिक सल्लागार शिष्य तयार करणार. | | ९ निवडक बाजारभाव... | १९० |
| | | १० शेती संशोधनाची अग्रगण्य संस्था | ... १९० |


# अर्थ

बुधवार, ता. २० एप्रिल, १९३८

## दारूबाजी व दारूबंदी

### हिंदुस्थान व इंग्लंड

हिंदुस्थानांत दारूची बंदी करून तिचा खप मर्यादित करण्याचे प्रांतिक सरकारांचे प्रयत्न चालू आहेत. ह्या दृष्टीनें इंग्लंडमधील परिस्थितीची माहिती मनोरंजक वाटेल. ग्रेटब्रिटनमध्यें दारूचा खप वाढत्या प्रमाणावर आहे, असें त्यासंबंधांतल्या प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून दिसून येतें. ब्रिटिश जनतेस बिअर विशेष प्रिय आहे. तिचा खप गेल्या वर्षी १९३६ सालापेक्षां सुमारें ६ टक्के वाढला. १९३२ सालाच्या मानानें त्यांत २८ टक्के वाढ झाली. बिअरची किंमत सरकारनें कमी करण्याचा हा परिणाम आहे. बिअरच्या पायीं १९३७ मध्यें ब्रिटिश जनतेचे २१५ कोटि रुपये खर्च झाले. सर्व प्रकारच्या मादक पेयांप्रीत्यर्थ ब्रिटिश लोकांनीं ह्या वर्षी सुमारें ३४६ कोटि रुपये खर्चले. दारू गाळण्याच्या धंदेवाल्यांस अजमासें ४० कोटि रुपये इतका नफा १९३६-३७ सालीं मिळाला. पूर्वसालापेक्षां ह्यांतहि वाढावा दिसून आला. दारूबाजांवर झिंगल्याबद्दल भरलेल्या खटल्यांची संख्याहि सहाजिकपणें वाढली हें सांगावयास नको. बिअरच्या खपाच्या प्रमाणांत हे खटले वाढले आहेत असें त्या विषयींच्या आकड्यांवरून स्पष्ट दिसतें.

दारूच्या पायीं दरवर्षी दर माणशीं ब्रिटनमध्यें सुमारें ७५ रुपये खर्च होतात. हिंदुस्थानांत दर माणशी ह्याच्या निम्में एकूण उत्पन्न जेमतेम आहे ! म्हणजे, हिंदी माणसाची सरासरीनें जेवढी एकूण वार्षिक मिळकत आहे, तिच्या दुपटीपर्यंत ग्रेटब्रिटनमधील माणूस दारूवर खर्च करितो ! ब्रिटनमधल्या वीस वर्षांवरच्या प्रौढ माणसांचाच विचार केला तर त्यांतला प्रत्येक इसम प्रतिवर्षी सरासरीनें ११० रुपये दारूवर खर्च करतो, असा हिशेब निघतो. दारूची संवय असणारांचाच केवळ विचार केल्यास हा आकडा किती तरी पटीनें मोठा होईल. दारूबाजीमुळें सामान्य स्थितींतल्या कुटुंबाची काय अवस्था होते हें खालील आकड्यांवरून समजेल. दर पिंटला ५½ पेन्स ह्याप्रमाणें देऊन दररोज दोन पिंट दारू पिणारा इसम एका वर्षांत सुमारें २१५ रुपये दारूवर खर्चतो. म्हणजे दर आठवड्यास ४० रुपये कमावणारा मनुष्य ५½ आठवड्यांची कमाई दारूमध्यें फस्त करतो आणि त्याच्या कुटुंबास ४७ आठवड्यांच्या मिळकतीवर वर्षाचे ५२ आठवडे काढावे लागतात. तिकडे दारूच्या कारखानदारांचा निवळ नफा मात्र फुगत चालला आहे.

मुंबई इलाख्यांत दारूच्या खपास हळुहळु आळा घालण्याचें धोरण सरकारनें कांहीं वर्षांमागें उघड रीतीनें अंगिकारलें होतें, पण त्यांतला नेट अलीकडे नाहींसा झाला होता आणि तें टाकून दिलें असल्याची शंका उत्पन्न झाली होती. कॉंग्रेस प्रधानमंडळानें तें धोरण निश्चयपूर्वक पुन्हां चालू केलें असून कांहीं क्षेत्रांत पूर्ण दारूबंदी आणि इतरत्र त्यास मर्यादा अशा रीतीची योजना अंमलांत आणली आहे. मद्रास प्रांताच्या सरकारनें सालेम जिल्ह्यांत दारूबंदीचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर चालवला आहे. तेथील प्रयत्नाविषयींची माहिती सालेमच्या युरोपिअन डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें सादर केलेल्या रिपोर्टांत उपलब्ध आहे. तीवरून हा दारूबंदीचा प्रयोग यशस्वी होऊन त्याच्या योगानें सालेम जिल्ह्यांतील जनतेचें भरीव हित होत आहे असें अभिनंदनीय अनुमान निघतें. दारूखात्याचे सरकारी अधिकारी आणि बिन-अधिकारी कार्यकर्त्यांच्या संस्था ह्यांच्या सहकार्यानें सालेममधील ताडीचा पुरवठा बंद करण्याची खटपट चालली आहे. ह्या कामांत पुष्कळच अडचण भासत आहे ह्यांत शंका नाहीं. त्या जिल्ह्यांत तीन लक्ष झाडांपासून माडी काढण्यासाठी सहा हजार परवाने अगोदरच दिले गेले आहेत. परवानेवाल्यांस त्या झाडांच्या रसाची ताडी बनवूं द्यावयाची नाहीं हें कार्य दारूबंदीच्या कार्यक्रमांत मुख्य पण अवघड आहे. दुसरी अडचण ताडीच्या ऐवजीं गांजा, अफू वगैरे मादक पदार्थांचा वाढता खप होण्याबाबतची आहे. हे पदार्थ चोरून बाहेरून आणण्याची प्रवृत्ति सालेम जिल्ह्यांत वाढली आहे ह्यांत शंका नाहीं. त्यांची दारू तोडली गेल्यानें कित्येक व्यसनी लोक मेथिलेटेड स्पिरिट पिण्यासहि मागेंपुढें पहात नाहींत.

दारूबंदीच्या मार्गांत अशा अनेक अडचणी असल्या तरी सालेम जिल्ह्याचा अनुभव आशाजनक आहे. दारू सुटल्यामुळें व्यसनी लोकांच्या प्रकृतींत सुधारणा झाली असून खेडेगांवांतले तंटे पुष्कळ कमी झाले आहेत. कर्जें काढण्याच्या प्रवृत्तीस आळा बसत असून बचत करण्याची संवय लोकांत वाढत आहे. दारिद्र्यानें गांजलेल्या जनतेची मिळकत दारूमध्यें खर्च झाल्यानें हजारों गरीब कुटुंबांची उपासमार चालली होती, घरांत तंटेबखेडे होत होते आणि कर्जबाजारीपणा वाढत होता. दारूबंदीच्या चार महिन्यांच्या अनुभवावरून ह्या परिस्थितींत सुधारणा होत असल्याचें दिसून येतें, असें सालेम जिल्ह्याच्या कलेक्टरनें आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे. हा प्रयोग तसाच नेटानें चालवल्यास जिल्ह्यांतील शेतकरी व कामकरी ह्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितींत चांगली व टिकाऊ सुधारणा झाल्यावांचून रहाणार नाहीं अशी त्यांस खात्री वाटत आहे. मुंबई इलाख्यांतील दारूबंदीच्या प्रयोगाचे दृष्टीनें हा अनुभव आणि अभिप्राय मार्गदर्शक झाल्यावांचून राहणार नाहीं.

---

## परराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार ( फॉरिन एक्सचेंज )

### ( ४ )

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

( मागील अंकावरून समाप्त )

( १३ ) प्रत्येक राष्ट्राचें चलन कायद्यानें निश्चित केलेल्या वजनाच्या सोन्याशीं प्रमाणबद्ध असल्यानें आणि चलनाचा मोबदला सोनें व सोन्याचा मोबदला चलन असा विनिमय निश्चित दरानें करण्यास सरकार बांधलेलें असल्यामुळें पुरेसा सुवर्णनिधि मध्यवर्ती बँकेमध्यें बाळगणें आवश्यक होतें. ह्या सुवर्णनिधीचें राष्ट्रीयदृष्ट्या असलेलें आर्थिक महत्त्व लक्षांत घेतलें असतां ज्या हुंडणावळीच्या दरानें सोनें देशाबाहेर जाण्याचा संभव तो 'प्रतिकूल' आणि त्याच्या उलट प्रवृत्ति असणारा 'अनुकूल' असें वाटण्यास जागा होते. आपल्या राष्ट्रीय चलनाच्या मोबदला परराष्ट्रीय चलन जितकें अधिक मिळेल आणि सोन्याच्या मानानें त्याची मजबुती जितकी ज्यास्त होईल तितकी हुंडणावळीच्या दराची अनुकूलता ज्यास्त.

( १४ ) मग येथें दिलेल्या १ रुपयाचे बाहेर १८ पेन्स मिळाले तर तो हुंडणावळीचा दर अमान्य करून हिंदी लोकांनीं १६ पेन्सचा दर असावा असा आग्रह कां धरला होता? हा प्रश्न उद्भवतो. हुंड्या विकणारे व विकत घेणारे ह्यांचे हितसंबंध परस्परविरुद्ध असतात हें मी मागें सांगितलेंच आहे. येथें १ रुपया भरून विलायतेंत त्याबद्दल १८ पेन्स मिळावे असें हुंडी विकत घेणारा इच्छिणार तर आपल्या मालाच्या विलायतेंत होणाऱ्या किंमतीबद्दल आपणांस अधिक रुपये मिळावे अशी निर्गत करणाऱ्या व्यापाराची इच्छा असणार. १३⅓ रुपयांचा १ पौंड मिळवण्याची ( २४०÷४⁰⁄₃=१८ पेन्स हुंडणावळीची ) एकाची इच्छा असणार तर दुसरा आपल्या १ पौंडाच्या हुंडीचे १५ रुपये करण्याची ( २४०÷१५=१६ पेन्स ) म्हणजे १६ पेन्स हुंडणावळीची खटपट करणार. हिंदुस्थानचा निर्गत व्यापार आयात व्यापारापेक्षां नेहमी जास्त असतो व ह्या कारणानें हुंड्या खरेदी करणारांपेक्षां त्या विकणारे अधिक असतात. बहुसंख्य हिंदी जनतेचें हित शेतीच्या निर्गत होणाऱ्या मालास १६ पेन्स भावानें दर पौंडास १५ रुपये मिळावे ह्यांत असणार. मालाची परदेशांतून आयात करून १८ पेन्स भावानें थोड्या पैशांत त्याचें देणें देऊन टाकणारांचें हित सबंद राष्ट्राच्या फायद्याचे दृष्टीनें गौण ठरतें. प्रतिवर्षी कोट्यवधि रुपये हिंदुस्थान सरकारास विलायतेंत पाठवावे लागत असल्यानें त्याचा कल १८ पेन्सच्या दराकडे होता हें सहज समजण्यासारखें आहे.

( १५ ) सोन्याच्या आयात-निर्गतीच्या आधारावर आंतरराष्ट्रीय व्यापारांतलें देणें-घेणें भागवलें जाणें मामुली व शांततेच्या परिस्थितींत शक्य होतें. महायुद्धाच्या व त्याच्या नंतरच्या काळांत चलनांचा सोन्याचा आधार तुटून हुंडणावळीचे दर हवेमध्यें हेलकावे खात राहिले. १९२५-२६ सालीं आर्थिक परिस्थिति निवळली ह्या बुद्धीनें इंग्लंडनें सुवर्ण परिमाण चलनपद्धति पुन्हां चालू केली. तथापि, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कर्जाचें ओझें, जर्मनीनें द्यावयाच्या युद्धखंडणीची फेड होण्याचे मार्गातल्या अडचणी, तुटीचीं राष्ट्रीय बजेटें, आंतरराष्ट्रीय अविश्वास वगैरे कारणांमुळें १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत इंग्लंडनें सुवर्ण परिमाण चलन व्यवस्था सोडून दिली. आतां ब्रिटिश पौंड ( कागदी ) सोन्याचा आधार नसल्यानें हेलकावे खाऊं लागला. एक औंस सोन्याची पूर्वी ८५ शिलिंग किंमत होती, ती पौंड हलका होऊन १०० शिलिंग झाली.

( १६ ) गाडीबरोबर नळ्याची यात्रा ह्या न्यायानें हिंदी रुपयाची किंमत खालावलेल्या ब्रिटिश पौंडाला जोडण्यांत येऊन त्याच्या मानानें ती उतरली. आज हिंदी रुपयास सोन्याचें परिमाण किंवा माप नाहीं; अठरा पेन्सांच्या दरानें तो पौंडाचा अंश आहे. ग्रेटब्रिटननें सुवर्ण परिमाण उघड रीतीनें सोडून दिलें आणि अनेक राष्ट्रांनीं आपलें चलन बदललेल्या पौंडाशी जुळवून घेतलें. ह्या सर्व देशांचा "स्टर्लिंग एरिया" म्हणून एक गट बनला. फ्रान्स आदिकरून थोड्या मध्य युरोपियन राष्ट्रांनीं त्यांचें अनुकरण करण्याचें नाकारलें आणि त्या राष्ट्रांचा "गोल्ड ब्लॉक" झाला. अमेरिकेनेंहि, ग्रेटब्रिटननें आपलें चलन हलकें केलें ( डिप्रीशिएशन ) असें पाहून डॉलरमध्यें चाळीस टक्के कमी सोनें असल्याचें जाहीर केलें. हीं दोन्हीं चलनें जवळ जवळ सारखींच हलकीं झाल्या कारणानें त्यांचें परस्पर प्रमाण ( स्टर्लिंग-डॉलर एक्सचेंज ) पूर्ववत १ पौंड = ४·८६ डॉलर ह्या सुमारांत राहिलें. ह्यानंतर फ्रान्सला दम धरवेना आणि त्या राष्ट्रानेंहि सुवर्णत्याग करून आपलें चलन स्टर्लिंग व डॉलर ह्यांच्या योग्य प्रमाणांत आणलें. ह्या कामीं इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स ह्यांनीं सहकार्य करावयाचें ठरवून नवीन ठरलेल्या हुंडणावळीच्या दरांत स्थैर्य राखण्याचा निश्चय केला.

( १७ ) सुवर्ण परिमाण पुन्हां कायदेशीर रीतीनें चालू होईपर्यंत हुंडणावळीच्या प्रचलित दरांस विशेष हेलकावे बसूं नयेत ह्यासाठी सदरहु राष्ट्रांनीं "एक्सचेंज इक्वलायझेशन फंडा" ची स्थापना केली. सोन्याच्या आयात-निर्गतीचा आणि व्यापाराच्या उलाढालींचा परिणाम हुंडणावळ, खेळत्या पैशाचा पुरवठा व व्याजाचे दर ह्यांचेवर होऊं नये म्हणून फंडांचे मार्फत सोन्याची खरेदी-विक्री केली जाते आणि मध्यवर्ती बँकेच्या हिशेबांशी तिचा संबंध येऊं दिला जात नाहीं. राष्ट्रीय चलनें व परराष्ट्रीय हुंडणावळ ह्यांच्या व्यवस्थेस ही एक महत्त्वाची जोड देण्यांत आली आहे. सोनें आलें किंवा गेलें तर त्याचा धक्का ह्या योजनेच्या योगानें राष्ट्रीय चलनास लागत नाहीं. चलनव्यवस्थेच्या भोंवती घातलेलें हें एक कुंपण आहे, आणि तें हुंडणावळीच्या प्रचलित दरांत विशेष चढउतार होऊं देत नाहीं.

( १८ ) आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या व्यवहारांच्या ओघांत स्वतःच्या जोरावर सहज चालणारी हुंडीची पद्धति अगतिक होऊन तिच्या जागीं कृत्रिम रीतीनें सरकारांनीं चालू ठेवलेली व्यवस्था आज जगांत सर्वत्र नांदत आहे. पूर्वीच्या सुवर्ण परिमाणपद्धतीचें पुनरुज्जीवन होईल किंवा नाहीं आणि झाल्यास तें केव्हां होईल हें सांगणें आज अशक्य आहे.

---

व्ही. व्ही. ॲन्ड को०
जंपर स्पेशालिस्ट
लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,
४८ निहाल पेठ ( मुदलीयार रोड ), पुणें शहर.

# स्फुट सूचना

## जमीन गहाणाच्या बँका—मद्रास आणि मुंबई

जमीन गहाणाच्या सहकारी बँक्स मोठ्या प्रमाणावर काढून त्या प्राथमिक अवस्थेंत सरकारच्या सहायानें चालवण्याचा उद्योग मद्रास प्रांतांत मोठ्या उत्साहानें करण्यांत आलेला आहे. परलोकवासी सर एम. रामचंद्रराव ह्यांच्यासारख्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली जमीन गहाणाच्या बँकांची घटना झाली आणि मद्रास सरकारनें ह्या चळवळीस विस्तृत सहाय दिलें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या मानानें मुंबई इलाख्यांतील जमीन गहाणाच्या बँकांविषयींचें कार्य अत्यंत मंद गतीचें आणि अल्प प्रमाणाचें आहे असें म्हणणें प्राप्त आहे. ह्या बँका जिल्हानिहाय स्थापन करून त्यांची कांहीं वर्षें जोपासना व्हावी म्हणून मद्रास सरकारनें जेवढी मदत केली आहे तिच्या मानानें मुंबई सरकारचें काम फिकें पडतें ह्यांत शंका नाहीं. जमीन गहाणाच्या सहकारी बँकांचा विस्तार व्हावा म्हणून मद्रास सरकारनें जादा अधिकारी नेमून त्या संस्थांच्या खर्चासाठी ग्रँट्सहि दिल्या. ह्या सब डेप्युटी रजिस्ट्रार्सची संख्या २६ आहे आणि ते अधिकारी जमीन गहाणाच्या बँकांच्या कामासाठी आणखी कांहीं वर्षें तसेच राहून त्यांचा खर्च सरकारनें सोसावा असें नुकतेंच जाहीर करण्यांत आलें आहे. बारा नवीन प्राथमिक बँक्स स्थापन करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे आणि त्याकरितां चार सब डेप्युटी रजिस्ट्रार्सच्या जादा जागा निर्माण केल्या जाणार आहेत. मद्रास सरकारचा हा उत्साह व औदार्य अनुकरणीय आहे. मुंबई इलाख्यांत प्रांतिक जमीन गहाणाच्या बँकेचीं डिबेंचर्स निघून भांडवल उभें करण्याचा प्रश्न अजून रेंगाळतो आहे आणि प्राथमिक बँकांच्या विस्तारास सरकारकडून अधिक चालना व सहाय मिळणें आवश्यक आहे. मद्रासच्या उदाहरणापासून मुंबई सरकार योग्य तो बोध घेईल काय ?

---

## प्राप्तीवरील कर—सर जेम्स ग्रिग ह्यांचा युक्तिवाद

सरकार आणि विरोधी पक्ष ह्यांचेमध्यें तडजोड होऊन प्राप्तीवरील कराचें बिल कमिटीकडे सोपविलें गेलें आणि त्यावर अभिप्राय व्यक्त करण्याची संधी टीकाकारांस देण्याचें सर जेम्स ग्रिग ह्यांनीं मान्य केलें. असेंब्लींत झालेल्या चर्चेंत सरकारच्या प्राप्तीवरील कराच्या योजनेस घेण्यांत आलेल्या आक्षेपांस हिंदुस्थान सरकारच्या फडनविसांनीं उत्तर देण्याचा प्रयत्न केला. “ हिंदुस्थानसारख्या दरिद्री देशांत आर्थिक सामर्थ्याच्या योग्य प्रमाणांत लोकांवर कराचा बोजा बसणें आवश्यक असतां प्रत्यक्ष करांपेक्षां अप्रत्यक्ष करांचें ओझें आठपट मोठें आहे. ग्रेटब्रिटनमध्यें राष्ट्रीय उत्पन्नाचा दहावा हिस्सा प्रत्यक्ष करांच्या मार्गानें तेथील सरकार घेतें; हिंदुस्थानांत हें प्रमाण एकदशांशाचे ऐवजीं एकशंभरांश एवढेंच आहे. बिलांतली करयोजना मान्य झाल्यास प्रत्यक्ष करांचा बोजा एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या एक टक्क्याऐवजीं दीड टक्का होईल इतकेंच. म्हणजे, ह्या देशांत पैसेवाल्या लोकांवरचा कराचा बोजा अत्यंत हलका आहे आणि त्या मानानें सामान्य गरीब जनतेस सहन कराव्या लागणाऱ्या करांचें ओझें जड आहे, हें स्पष्टच होतें.” हिंदुस्थानांतल्या दरिद्री जनतेची आठवण सर जेम्स ग्रिग ह्यांस डोईजड लष्करी खर्च व इतर महत्त्वाच्या बाबी ह्यासंबंधांत मात्र होत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हा देश कृषिप्रधान आहे, दरिद्री आहे, ह्या कारणानेंच जकातींसारख्या अप्रत्यक्ष मार्गांनीं सरकारास करांचा पैसा उभा करावा लागत आहे, हें ते सांगण्यास विसरले. ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्या देशांची संपत्ति, राष्ट्रीय उत्पन्न व प्राप्तीवरील कर ह्यांचे संबंधांत तुलनाच होऊ शकत नाहीं. हा कर उत्पादक होण्यास लोकांची प्राप्ति मोठी असावी लागते आणि तिची विभागणी समाजांत विस्तृत रीतीनें होणें आवश्यक असतें. हिंदुस्थानांत उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर नाहींत म्हणून लोकांची प्राप्ति मोठी नाहीं आणि लोकांची प्राप्ति मोठी नाहीं म्हणून प्राप्तीवरील करांचें उत्पन्न मोठें नाहीं. जकातींच्या स्वरूपांतील करांचा अवलंब करून त्यांच्या बोजाची वांटणी सर्व जनतेवर करणें सरकारास भाग पडतें, तें तरी ह्याच कारणाकरितां होय. सर जेम्स ग्रिग पैसेवाल्या वर्गावर घसरले तेव्हां त्यांनीं ह्या बाजूचा विचार केला असता तर बरें झालें असतें. पण तसें करणें त्यांस सोयीचें नव्हतें हें उघड आहे.

---

## सरकारचे आर्थिक सल्लागार शिष्य तयार करणार

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार म्हणून प्रो. ग्रेगरी ह्या ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाची नेमणूक झाली त्यावेळीं ह्या देशांत त्या कामास लायक असे तज्ज्ञ मिळणें शक्य नव्हतें कीं काय असा प्रश्न उपस्थित करण्यांत आला होता. त्यास सर जेम्स ग्रिग ह्यांनीं नकारार्थी उत्तर दिलें होतें आणि त्यासंबंधांत हिंदी लोकमत सरकारच्या अपमानास्पद धोरणामुळें अत्यंत असंतुष्ट झालें होतें. सत्तेपुढें शहाणपण फुकट ह्या न्यायानें जनतेचा आक्षेप अर्थातच व्यर्थ गेला. प्रो. ग्रेगरी ह्यांचें स्थान आतां स्थिर झालें असून त्यांनीं करावयाच्या विधायक कामगिरीची योजना अजून निश्चित झालेली नसली तरी आर्थिक बाबींसंबंधांतल्या माहितीचे आंकडे व्यवस्थित रीतीनें गोळा होऊन पद्धतशीर मांडले जावे व प्रसिद्ध व्हावे ह्या बाबतींत त्यांनीं सूचना केल्या असून त्यांची अंमलबजावणी होत आहे असें सांगण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें त्यांचें एक महत्त्वाचें कार्य होतकरू हिंदी अर्थशास्त्रज्ञ आपल्या कामीं शिकवून तयार करण्याचें आहे आणि त्यासहि प्रारंभ झाला असल्याचें समजतें. अशा लोकांची निवड केली जात असून तिच्याविषयीं निर्णय लवकरच प्रसिद्ध व्हावयाचा आहे. हिंदी होतकरू आर्थिक तज्ज्ञ शिकवून तयार करण्याचें धोरण ठीक आहे. पण हिंदी अर्थशास्त्रज्ञांवर नालायकीचा शिक्का मारून त्यांचेविषयीं आपला अविश्वास सरकारनें व्यक्त केला आहे, त्याची काय वाट ?

---

## गिरणी कामगार कोट्याधीश झाला

ग्रेटब्रिटनमधील ब्रॅडफर्ड येथील एक गिरणी कामगार, हॅरी वॉर्डमन्, ह्यानें ३५ वर्षांमागें अमेरिकेंत पदार्पण केलें, त्यावेळीं त्याचेजवळ फक्त ५ रुपये होते. मिळेल तें काम करून त्यानें नंतर सुतार कामांत प्रावीण्य मिळविलें. थोडे पैसे शिल्लक टाकून त्यानें वॉशिंग्टन येथें स्वतंत्र कंत्राटदार म्हणून धंदा स्थापन केला. त्या शहरांतील ६० हजार लोक, ( म्हणजे प्रत्येक दहांतील एक मनुष्य ) आतां वॉर्डमननें बांधलेल्या घरांत, चाळींत अगर हॉटेलांत रहातात. तो नुकताच ८ कोटि रुपयांची मालमत्ता मागें ठेवून मरण पावला.

---

### महायुद्धांतील बळी

नवीन युद्धाचे वारे एकीकडे जोरानें वहात आहेत व त्याच वेळीं गेल्या महायुद्धांत पडलेल्या सैनिकांच्या प्रेतांची नांवानिशी वासलात लावण्याचें काम अद्याप चालू आहे ! ११ लक्ष मृत ब्रिटिश सैनिकांपैकीं ५३ लक्ष सैनिकांस स्वतंत्रपणें पुरण्यांत येऊन थडग्यांवर त्यांचें नांव लावण्यांत आलें आहे; बाकीच्यांचीं व्यक्तिशः नांवें सांपडत नाहींत. गेल्या वर्षी फ्रान्समधील रणांगणावरील थडग्यांतील १८९ सैनिकांचीं नांवें शोधाअंतीं सापडलीं व त्यांस पुनः स्वतंत्रपणें पुरण्यांत आलें. हें सर्व काम वॉर ग्रेव्हज कमिशन करीत असतें.

### पोस्टल कॅशसर्टिफिकिटांविषयीं नवीन नियम

पोस्टाच्या पंचवार्षिक कॅशसर्टिफिकिटांचे बाबतींतल्या नियमांत दुरुस्ती केलेली जाहीर झाली आहे. कोणत्याहि व्यक्तीस एका किंवा अधिक नांवांवर दहा हजारांपेक्षां अधिक दर्शनी किंमतींचीं सर्टिफिकिटें धारण करतां येणार नाहींत. त्या मर्यादेच्यावर दर्शनी किंमत गेल्यास फाजील रकमेवर व्याज मिळणार नाहीं आणि तितकीं सर्टिफिकिटें पैसे घेऊन परत केलीं पाहिजेत. ह्या नियमाविरुद्ध सर्टिफिकिटें धारण करणारांस पैसे मिळाले असल्यास ते परत केले पाहिजेत आणि त्याबद्दलची जोखीम सद्रहु व्यक्ति अथवा त्यांची मालमत्ता ह्यांचेवर राहील.

### जितकीं खातीं तितके विभाग

निरनिराळ्या खात्यांच्या कारभाराच्या सोयीसाठी मुंबई इलाख्याची जिल्ह्यांत व विभागांत वांटणी केलेली आहे. रेव्हिन्यू, इरिगेशन, फॉरेस्ट, पोलीस, पोस्ट ऑफिस ह्यांचे भौगोलिक विभाग भिन्न भिन्न आहेत. लंडनच्या लोकसंख्येची गणती १४ निरनिराळ्या विभागांचे अन्वयें केली जाते. त्यांत मोठें लंडन, पोलीस लंडन, पोस्टल लंडन, परगणा लंडन ह्या विभागांचा समावेश होतो.

### सक्कर धरणाकरितां काढलेल्या कर्जाची फेड

सिंध प्रांतानें १ एप्रिल, १९३६ नंतर आतांपर्यंत आपल्या लॉइड धरणावरील कर्जापैकीं ४४ लक्ष रुपये मुद्दल फेडलें आहे व २ कोटि, ३९ लक्ष रुपये व्याज दिलें आहे. ३१ मार्च, १९५२ रोजीं शिल्लक रहाणारें कर्ज ४० वर्षांचे अवधींत फिटावें व त्या कर्जावर ४३ टक्के दरानें व्याज आकारण्यांत यावें, अशी योजना आहे.

### रशियांत कपाशीच्या लागवडीचा विस्तार

सोव्हिएट रशियामध्यें १९२८ सालीं कपाशीच्या पिकाखाली २१ लक्ष ७८ हजार एकर जमीन होती. गेल्या सालीं हा आकडा ५२ लक्ष ५० हजार झाला. रशियाच्या गिरण्यांस लागणारा कापूस आतां परदेशांतून आणावा लागत नाहीं. कपाशीच्या उत्पादनांत अमेरिकेचा पहिला नंबर, हिंदुस्थानचा दुसरा व रशियाचा तिसरा आहे. लांब धाग्याच्या कापसाची पैदास रशियांत पूर्वीच्या मानानें पुष्कळच वाढली आहे.

### ब्रिटिश रेल्वेसाठी " स्वदेशी " सामान

एका ब्रिटिश रेल्वेनें गोणपाट, लाकडी स्लीपर्स व त्यांच्यासाठी क्रिओसोट वगैरे माल मोठ्या प्रमाणांत खरेदी केला असून ग्रेटब्रिटनमधील व्यापाऱ्यांकडूनच तो सर्व घेण्यांत आला आहे. परकीय व्यापाऱ्यांकडून टेंडर्स मागवण्याची आवश्यकता नव्हती असें एक ब्रिटिश साप्ताहिक लिहितें.


म. गांधींची उदात्तता-
हिमालयाची उत्तुंगता-
ताजमहालाचें सौंदर्य-
यांनीं

सारी मुंबई दिपवणारा
ज्वाला

हंसाचा पांचवा बोलपट

भूमिकाः-चंद्रमोहन, रत्नप्रभा, विनायक

विक्रीस तयार ] विक्षिप्तराव [ दुसरी आवृत्ति

लेखकः—प्रो. वा. गो. काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे. ' विक्षिप्तराव ' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळांमधून तें करण्यास फार उपयुक्त आहे. किंमत फक्त १० आणे.

DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

ता. ३० मार्च, १९३८ च्या "अर्था"च्या अंकांत सिंडिकेट दरसाल ५½ टक्के व्याजानें दोन वर्षे मुदतीनें डिपॉझिट रकमा स्वीकारते असें कळविल्यानंतर डिपॉझिट रकमा आल्या व कांहीं पत्रें आलीं त्यांत डिपॉझिट रकमा घेण्याची मुदत सिंडिकेटनें किती ठेवली आहे अशी माहिती विचारली आहे. सिंडिकेटला १९४० च्या हंगामाकरितां १२५० एकर ऊंस लावण्याचा आहे. एकरीं अंदाजें तीनशें रुपये खर्च येतो. १२५० एकर उंसाची लागण उरकल्यानंतर डिपॉझिट रकमा घ्यावयाच्या किंवा नाहीं हें संचालक मंडळ ठरवील व त्याप्रमाणें जाहीर करण्यांत येईल. तोंपर्यंत डिपॉझिट रकमा स्वीकारल्या जातील.

वर्षप्रतिपदेला मशिनरीच्या इमारतीचा व उभारणीचा पाया घालून कामाला सुरुवात केली आहे. इमारतीचें काम "पूना इंजिनियर्स लिमिटेड" या कंपनीनें घेतलें आहे. मशिनरी चांगलें काम देइल अशी हमी स्कोडा कंपनीकडून घेतली असल्यामुळें मशिनरीच्या उभारणीचें काम स्कोडा कंपनीच्या देखरेखीखाली होणार आहे व १९३९ च्या जानेवारी ते मार्च अखेर साखर तयार करण्याचें कामहि सदर इंजिनियर करणार आहे.

उंसाखाली सिंडिकेटच्या जमिनीचा जो भाग नाहीं त्यांत २५ एप्रिलपासून ३०० एकर कापूस व २०० एकर भुइमूग लावण्यांत येणार आहे. त्या योगानें रिकाम्या जमिनीपासून सिंडिकेटला उत्पन्न होईल.

विष्णु नारायण वर्तक, अध्यक्ष.

### बँकेच्या कामांत कॅमेऱ्याचें सहाय

पाश्चात्य देशांतुन बँकेच्या कामांत कॅमेऱ्याचें सहाय आतां वाढत्या प्रमाणावर घेण्यांत येत आहे. हिशेबाच्या वह्या, चेक्स, शेअर सर्टीफिकिटें व इतर महत्वाचे कागदपत्र ह्यांचे फोटे घेऊन ठेवणें बँकांस सोईचें वाटूं लागलें आहे. ह्या फोटोंचे साधनानें अगदी लहान आकाराच्या कागदावर लहानमोठ्या अनेक कागदपत्रांची नोंद करतां येते. जरूर वाटेल त्यावेळीं एका यंत्राचे सहायानें मूळ कागदाएवढी प्रत काढतां येते. बँकांप्रमाणें इतर संस्थांचे व्यवहारांतहि कॅमेऱ्यानें प्रवेश केला आहे.

### दर माणशी विजेचा खप
( खालील आकडे १९३४ सालाविषयीं आहेत. )

| देश | दर माणशी विजेचा खप ( युनिट्स ) |
|---|---|
| कॅनडा | १,७८८ |
| स्वीडन | १,००० |
| अमेरिका | ९२० |
| जर्मनी | ४९० |
| ग्रेटब्रिटन | १४० |
| हिंदुस्थान | ३ |

हिंदुस्थानांत तयार करतां येण्याजोग्या विजेच्या ३ टक्क्यांइतकी वीजहि सध्यां तयार केली जात नाहीं.


## ३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वी आपला विमा उतरवून नवीन बोनसमध्यें भागीदार व्हा.

२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. एकदां विमा उतरण्याचे ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.

अधिक माहितीकरितां लिहा :

## दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि०
पुणें २.

शाखा: मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.

### "अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,३०,२५० वसूल झालेलें भांडवल १,१४,७५५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. Y. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## देशी कांचकारखान्यांबाबत गैरसमज

(ले:— श्री. स. गो. पाध्ये)

ता. ५-४-३८ च्या टाईम्समध्यें "हिंदुस्थानांतील कांचेच्या धंद्यास मदत," "सुधारलेल्या तऱ्हेची भट्टी" अशा मथळ्या-खालीं टाईम्सकारांच्या दिल्लीच्या बातमीदारानें पाठविलेला कांहीं मजकूर प्रसिद्ध झाला आहे. टाईम्सच्या बातमीदाराला कांचेच्या धंद्याबाबत इतकी काळजी वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. तेव्हां ज्या रिसर्च बोर्डानें ही भट्टी बांधली व ज्याचें मत यायोगें आतां कांचेच्या धंद्यास फार मोठी मदत झाली असें आहे त्याच्या प्रेरणेनेंच तो प्रसिद्ध झाला असावा हें उघड आहे.

येथें प्रथम हें सांगावयास पाहिजे कीं सरकारकडून उद्योगधंद्यांचें बाबतींत जे जे चांगले प्रयत्न होतील त्याबद्दल जनता त्यांची आभारीच राहील. तसेंच, हे जे रिसर्च ब्यूरोचे प्रयत्न चालले आहेत त्याबद्दलहि हिंदुस्थानांतील कांचेचे कारखानदार सरकारचे आभारच मानतील. परंतु सरकारचे हे प्रयत्न तुटपुंजे आहेत व हिंदुस्थानांतील कांच कारखानदार जी संरक्षण पाहिजे, संरक्षण पाहिजे, अशी ओरड करीत आहेत ती अनाठायी आहे असा जो आभास सरकारकडून उत्पन्न केला जात आहे तो अश्लाघ्य आहे इतकेंच दाखवावयाचा येथें उद्देश आहे.

रिसर्च ब्यूरोनें आतां बांधलेल्या या भट्टीसारखी अगर ह्या दिशेनें सुधारणा केलेली अशी भट्टी ओगलेवाडी येथील ओगले ग्लास वर्क्समध्यें गेल्या सालापासूनच चालू असून त्यापासून कोळशाचे खर्चीत २५ टक्के बचत होते हें दिसूनहि आलें आहे. किंबहुना रिसर्च ब्यूरोचे असिस्टंट डायरेक्टर मि. डिक्सन मार्गें ओगलेवाडीस आले होते वेळीं त्यांचे व श्री. ओगले यांचे दरम्यान अशा भट्टीबाबत थोडी चर्चाहि झाली होती. लिहिण्याचा उद्देश इतकाच कीं रिसर्च ब्यूरोची ही भट्टी म्हणजे कांच कारखानदारांचे करतां सरकारनें काढलेली कांहीं किमया नव्हे कीं त्या योगानें आतां सर्व अरिष्टें दूर होणार. सुधारलेल्या भट्टीमुळें कोळशाचे खर्चीत २५ टक्के बचत होते खरी, परंतु दरम्यान कोळशाचे भाव रु. २-८-० टनापासून रु. ६-१२-० टनापर्यंत वाढून बसल्याकारणानें ही २५ टक्के बचत प्रत्यक्ष पदरांत न पडतां कांच कारखान्यांची स्थिति आहे तीच राहिली आहे.

तसेंच सोड्याबाबतहि. सुधारलेल्या भट्टीपासून चांगलें उष्णतामान मिळतें व त्यायोगें थोडासा सोडा कमी लागून सोड्याचे खर्चीत बचत होतें हेंहि ठीक आहे. परंतु असा सोडा कमी लागून एकंदर खर्चीत किती बचत होणार ? फार फार झाली तर सोड्याच्या खर्चीत ५ टक्के. परंतु ज्यांचे हातीं सोड्याची मोनापलीच आहे अशा इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज या कंपनीनें सोड्याचा भाव लगेच रु. ४-१०-० हंड्रेडवेटापासून रु. ५-१० हंड्रेडवेटापर्यंत वाढवून ठेवला. म्हणजे, या भट्टीपासून सोड्यावर होणारी बचत जर, फार झाल्यास, १० टक्के तर या मोनापली-वाल्यांच्या भावांतील वाढ २५ टक्के ! आतां कांच कारखानदा-रांच्या पदरांत काय पडलें हें सरकारनेंच पहावें. लिहिण्याचा हेतु इतकाच कीं असावयाचें एक व भासवावयाचें भलतेंच, असा हा प्रयत्न आहे.

---


# आपण विचार केला आहे का ?—

श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी ता. १।१।३८ च्या 'केसरी'त लिहितात. "......सर्वसाधारण बाँड योजनांच्या विरुद्ध मी तो लेख लिहिला असें नाहीं. बाँड योजना हा विम्याच्या अनेक प्रकारांपैकीं एक प्रकार आहे व प्रत्येक योजनेचा विचार जिच्या तिच्या गुणावरून केला पाहिजे..." सही ग. स. मराठे.

## कल्पतरु बॉण्ड

इतका लोकप्रिय होण्याचें कारण—ती योजना बहुजनांस पटली आहे. अजूनहि फक्त १३॥ रु. भरून 'कल्पतरु बॉंड' घेतल्यास येत्या बक्षीस वांटणींत बक्षीस मिळण्याची संधि साधतां येईल. अधिक माहितीकरितां स्थानिक प्रतिनिधीस भेटा, किंवा खालील पत्त्यावर लिहा :

टी. आर. अमंग ऑफ ॲ. सातारा सिटी | महाराष्ट्र इन्शुअरन्स कं. लि., कऱ्हाड (जि. सातारा)

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ इण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. अँण्ड. एम्. स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बई, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, एम. एल. सी.

मॅ. डिरेक्टर : एस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दर-साल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्या-संबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. जमशेदजी, अेजण्ट, मुंबई | एस्. एस्. भावे, एलएल्. बी. सेक्रेटरी, पुणें.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
# V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

# संगीत-मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

# —कार्यक्रम—

( १ ) वर्षप्रतिपदेला ( चैत्र शुद्ध १ )
मशिनरीच्या उभारणीला प्रारंभ.

( २ ) १९३९ च्या जानेवारींत
साखर करण्यास प्रारंभ.

**दरवर्षी ५॥ टक्के व्याज**
व
दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेलः—

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.**

२५७ बुधवार पेठ, बेलबागेसमोर,
भिडेवाडा, पुणें २.

# स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.


# गव्हाचे पोहे

( REGD. ) **( BLOSSOM )** ( REGD. )

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव } भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे
पुणें २. } कारखानदार.



# टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]

मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

# झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
**MARATHI KENDRA :** *292 Sadashiv Peth* POONA

# K. K. & Co.

**Photographic Dealers**
POONA.

# ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत घेण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११८—६ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०३–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—४ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८–६½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—३ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळयांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १३७—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १११–८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०–१० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५४०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११७–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६–१२ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% .... ... ... | ७२०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२५—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २००—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३५३–१२ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४२५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १५६—४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४—८ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १७–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३७–१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४२९५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १७२–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २२९—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ९९२—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३५–१५½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४८—५ |

## शेतीसंशोधनाची अग्रगण्य संस्था

### इंपीरियल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटचें कार्य

शेतीसंवर्धनास सहाय व्हावें ह्या उद्देशानें बिहार प्रांतांत पुसा येथें हिंदुस्थान सरकारनें १९०५ सालीं एक संशोधन केंद्र (इंपीरियल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट) स्थापन केलें. मि. हेन्री फिप्स ह्या एका अमेरिकन गृहस्थाच्या ४ लक्ष रुपयांच्या देणगीनें इन्स्टिट्यूटच्या कार्यास प्रारंभ झाला. १५ जानेवारी, १९३४ रोजीं झालेल्या धरणीकंपानें इन्स्टिट्यूटच्या इमारती निकामी केल्या व दिल्ली येथें संस्थेचें स्थलांतर करण्याचें ठरलें. दिल्ली येथील जमीन पिकांबाबत प्रयोग करण्यास ज्यास्त सोईची असल्याचें आढळून आलें आहे. नवीन इमारती आतां पूर्णपणें तयार झाल्या आहेत व इन्स्टिट्यूट आपल्या नवीन जागीं गेली आहे.

### शेतीचे उत्पन्नांत वाढ

इन्स्टिट्यूटच्या संशोधनात्मक कार्यामुळें हिंदी शेतीचा किफायतशीरपणा वाढला आहे. हिंदुस्थान सरकारनें १९०५–०६ ते १९३६–३७ ह्या ३१ वर्षांचे अवधींत इन्स्टिट्यूटवर २ कोटि, ८२ लक्ष रुपये खर्च केले आहेत; तथापि इन्स्टिट्यूटच्या कार्यामुळें हिंदी शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नांत ४½ कोटि रुपयांची भर पडली आहे, असा अजमास आहे. औद्योगिक महत्त्वाचीं पिकें व खाण्याचीं धान्यें ह्यांच्या नवीन जाती तयार करून इन्स्टिट्यूटनें शेतीचें उत्पादन वाढवलें आहे. ऊंस व गहूं ह्या दोन पिकांबाबतची इन्स्टिट्यूटची कामगिरी खालीं वर्णिली आहे.

### ऊंस

१९२४-२५ ते १९३४-३५ ह्या मुदतींत सुधारलेल्या उंसाची लागवड ७५ हजार एकरांवरून २४½ लक्ष एकरांवर गेली. उंसाचें एकूण क्षेत्र ह्याच १० वर्षांत २७ लक्ष एकरांचें ३८½ लक्ष झालें. म्हणजे, उंसाची लागवड ३२ टक्क्यांनीं वाढली परंतु सुधारलेल्या जातींच्या उंसाचें प्रमाण २८ टक्क्यांचें ६८ टक्के इतकें झालें, ह्यावरून त्यांची लोकप्रियता सिद्ध होते. १९२४-२५ मध्यें दर एकरी उंसाचें उत्पादन ११·०५ टन इतकें झालें; १९३४-३५ सालीं सरासरीनें १५·९ टन ऊंस प्रत्येक एकरांत निघाला; म्हणजे तेवढ्याच क्षेत्रांतून दीडपट उत्पन्न मिळालें. १९३४-३५ मध्यें, सुधारलेल्या उंसाखालीं २४½ लक्ष एकर जमीन होती. त्यांतून २६ लक्ष, ९० हजार टन ऊंस ज्यास्त निघाला, असें समजल्यास प्रत्येक मणास ८ रु. ८ आ. ह्या दरानें एकूण उत्पन्नांत २ कोटि, २९ लक्ष रुपयांची भर पडली, असा हिशेब झाला. सुधारलेल्या कोइमतूर उंसाच्या लागवडीचा हा सुपरिणाम होय.

### गहूं

सुधारलेल्या पुसा जातीच्या गव्हाची लागवडहि हळुहळु पसरत आहे. १९३४-३५ सालीं, एकूण लागवडीपैकीं एक पंचमांश क्षेत्र पुसा गव्हानें व्यापलें होतें. सबंध हिंदुस्थानांतील उत्पादनाच्या सरासरीनें, प्रत्येक एकरांत ७·६ मण गहूं पिकतो. पुसा गव्हानें त्यांत २ मणांची भर घातली आहे. अर्थात्, सर्व हिंदुस्थानभर प्रत्येक शेतांतच हा वाढावा आढळणार नाहीं. दर एकरीं एक मण ज्यास्त गहूं पिकतो ह्या हिशेबानें, प्रत्येक मणास ३ रु. ह्या दरानें, १९३४-३५ सालीं हिंदी गव्हाच्या उत्पन्नांत १ कोटि ९५ लक्ष रुपयांची भर पडली असल्याचें आढळतें.


ऊंस व गहूं ह्यांप्रमाणें इतर पिकांचें उत्पादनहि इन्स्टिट्यूटनें सुधारलें आहे, तें हिशेबांत धरल्यास हिंदी शेतीच्या उत्पन्नांत वार्षिक ४ कोटि रुपयांचा वाढावा दिसून येतो. इन्स्टिट्यूटनें शेतीसंशोधनाचे बाबतींत अत्यंत उपयुक्त कार्य केलें असून, इतर अनेक संशोधन संस्थांचा जन्म तिच्या पुरस्कारानेंच झालेला आहे.

# हेच दिवस गोवें बघण्याचे!

## महाराष्ट्रांतील एका अत्यंत रमणीय प्रदेशांत सहल करण्यास चला.

हिंदुस्थानभर पसरलेले कर्तृत्ववान दाक्षिणी सारस्वत त्यांची ही धर्मभूमि. त्यांचे पूर्वज इथले. त्यांच्या वसाहतीची, कलाविकासाची चिरंजीव साक्ष म्हणजे येथील देव व देवळें. रम्य वनश्री, उंच गोपुरें, विस्तृत अग्रशाळा, तलाव इत्यादि वैशिष्ट्यानें अत्यंत प्रेक्षणीय वाटणारीं हीं देवळें अनेक आहेत. मंगेशींचा श्री-मांगिरीश, कवळेंची शांतादुर्गा, रामनाथींचा रामनाथ, नागेशींचा नागेश, बांदिवड्याची महालक्ष्मी, म्हारडोळची म्हाळसा, ह्या देव-देवता, त्यांचीं देवळें व त्यांच्या आसमंतांतील सृष्टिसौंदर्य नितांत रमणीय आहे.


गोमांतकांत रोमनकॅथॉलिक सांप्रदायी लोकांचीं देवळेंसुद्धां हिंदूंच्या देवळांइतकींच सुंदर व भव्य आहेत. त्यांतल्या त्यांत जुने गोयचीं ख्रिस्ती देवळें—जिथें सेंट फ्रॉन्सीसचें शव आज शेंकडों वर्षें राखून ठेवलें आहे —तीं देवळें फारच दर्शनीय आहेत, प्रत्येकानें तीं पहावींच.



श्रीमांगिरीश, मंगेश



श्रीशांतादुर्गा, कवळें



श्रीम्हाळसा, म्हारडोळ

गोव्यांतील आरोग्यदायी ठिकाणांमध्यें **कळंगुट** हा गांव फार प्रख्यात आहे. या दिवसांत कळंगुटच्या विस्तीर्ण समुद्रकांठीं लांबलांबचे लोक समुद्रस्नान व हवा फेर करण्यासाठीं येत असून ते तेथें महिनामहिना राहतही असतात. पणजीपासून अवघ्या दहा मैलांवर हें गांव असून स्टीमलॉंचीस व मोटार मधून तिथें एक तासाच्या आंत पोंचतां येतें.

गोवें पहाण्यास हेच दिवस सोयीचे. या वेळीं गोव्यांत विपुल फळफळावळ-गोव्यांतील प्रख्यात आंबे, फणस, काजू यांची समृद्धि आहे. गोव्याच्या अंतर्भागांत जाण्यासाठीं वहातुकीची सोय सुलभ, बिनत्रासाची व नियमित आहे.

**बी. एस. एन. च्या बोटींनीं गोव्याला चला. सुखसोयी, वेग व व्यवस्था या बाबतींत बी. एस. एन. च्या बोटी सर्वांत पुढें आहेत. दररोज सकाळीं ९–१० वाजतां आठवड्यांतील सातही दिवस त्या गोव्याला जाण्यासाठीं सुटत असतात.**

# बी. एस. एन. कंपनी लि.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २५, किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ महिने भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १


चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.




स्टॉकिस्ट : मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

## पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.